# पालिका शाळांत 'खेळखंडोबा'



## स्पोर्टस् सेंटरमध्ये क्रीडा साहित्यांचा अभाव

sourabh.sharma1@timesgroup.com

**मुंबई : राज्य शिक्षण विभागातर्फे शालेय विद्यार्थ्यांमधील क्रीडागुणांना वाव मिळावा यासाठी अभ्यासक्रमात गुण देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. मात्र दुसरीकडे मुंबई महापालिका प्रशासनाच्या दिरंगाईमुळे पालिका शाळांतील विद्यार्थ्यांना गेल्या दोन वर्षांपासून क्रीडा साहित्यच मिळाले नसल्याचे समोर आले आहे. गेल्या वर्षीपासून उभारण्यात आलेली ही क्रीडा संकुले क्रीडा साहित्याअभावी ओस पडली आहेत. विशेष म्हणजे पालिका अर्थसंकल्पात शालेय क्रीडा विभागासाठी १ कोटींची तरतूद असूनही पालिका विद्यार्थ्यांना या क्रीडा साहित्यांची प्रतीक्षाच आहे.**



फोटो प्रातिनिधिक आहे.

### असे असतील विद्यार्थी

- प्रत्येक मुख्य केंद्रासाठी ५० विद्यार्थ्यांची निवड
- प्रत्येक उपकेंद्रासाठी ५० विद्यार्थ्यांची निवड
- काही ठराविक केंद्रात १०० विद्यार्थ्यांची निवड
- एकूण १४०० विद्यार्थ्यांची निवड

### काय आहे स्पोर्टस् सेंटर?

मुंबई महापालिकेच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागातर्फे २०१३-१४पासून विद्यार्थ्यांना विविध खेळांचे प्रशिक्षण देण्याच्या उद्दिष्टाने १४ क्रीडा संकुले उभारण्यात आली आहेत.

### एकूण क्रीडा संकुले

पालिकेतर्फे १४ मुख्य क्रीडा संकुले उभारण्यात आली आहेत. या मुख्य क्रीडा संकुलांतर्गत १६ उपकेंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.

### या खेळांचे प्रशिक्षण

या संकुलांत कुस्ती, तायक्वांडो, ज्युडो, कबड्डी, बास्केटबॉल, फुटबॉल, किक बॉक्सिंग, खोखो, ॲथेलेटिक्स, हॅण्डबॉल, नेटबॉल यांसारख्या खेळांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

### साहित्यांचा अभाव

या क्रीडा संकुलात बॉक्सिंग किट, शूज, कुस्ती मॅट, व्हॉली बॉल किट, हॅण्ड ग्लोव्हज, बास्केटबॉल, कुस्ती किट, हॅण्ड बॉल गोल कोर्ट, स्टॉप वॉच, ज्युडो किट यांसारख्या अनेक क्रीडा साहित्यांचा अभाव आहे.

### अर्थसंकल्पातील तरतूद

- शालेय क्रीडा विभागासाठी **१ कोटी ७४ लाख**
- स्पोर्टस् सेंटरसाठी **९६ लाख**



**एकीकडे पालिका शाळेतील विद्यार्थी आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत यश संपादन करत आहेत, तर दुसरीकडे प्रशासनाच्या उदासीन कारभारामुळे हे विद्यार्थी सुविधांपासून वंचित आहेत. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. या संकुलांत तातडीने सोयी-सुविधा उपलब्ध करून द्यावी, यासाठी आपण आयुक्तांना निवेदन दिले आहे.**

- **शिवनाथ दराडे,** शिक्षण समिती सदस्य

# हृदयविकाराने एपीआयचे निधन

**म. टा. प्रतिनिधी,** मुंबई

पवई पोलिस स्टेशनमध्ये कार्यरत असलेले असिस्टंट पोलिस इन्स्पेक्टर प्रदीप सुरळकर यांचे रविवारी सकाळी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. सुरळकर गरब्याचा बंदोबस्त आटोपून शनिवारी मध्यरात्री एक वाजता घरी गेले होते. सुरळकर यांच्या पश्चात पोलिस दलात कार्यरत असलेली पत्नी आणि दोन मुले आहेत.

भांडुप (प.) येथे राहणारे ४२वर्षीय एपीआय सुरळकर पवई पोलिस स्टेशनच्या तपास (डिटेक्शन) विभागात कार्यरत होते. शनिवारी रात्री १२ वाजेपर्यंत गरब्याला परवानगी असल्याने ते बंदोबस्ताला होते. बंदोबस्त आटोपल्यानंतर मध्यरात्री एक वाजता ते आपल्या घरी पोहोचले. घरी पोहोचल्यावर त्यांनी छातीत थोडे दुखत असल्याचे आपल्या पत्नीला सांगितले. सकाळी १० वाजता उठल्यानंतर ते प्रसाधनगृहात गेले. मात्र बराच वेळ ते दार उघडत नसल्याने त्यांच्या पत्नीने दार ठोठावले. आतून सुरळकर यांनी काहीच प्रतिसाद न दिल्याने शेजाऱ्यांच्या मदतीने दार तोडण्यात आले. त्यावेळी एपीआय सुरळकर निपचित पडल्याचे दिसले. त्यांना भांडुपच्या पद्मावती हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. डॉक्टरांनी त्यांचे निधन झाल्याचे घोषित केले. रविवारी रात्री उशिरा त्यांच्यावर भांडुपच्या सोनापूर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# बोलीभाषांना रंगमंच मिळावा!

**म. टा. खास प्रतिनिधी,** मुंबई

'मला नाट्यसंमेलनाध्यक्ष पद मिळाले हा चमत्कारच वाटतो. खाचखळग्यातून झालेला प्रवास सर्वांच्या सहकार्याने आज सुकर झाला. यातही बोलीभाषेत आलेल्या 'वस्त्रहरण'ने मला ओळख दिली. अशा बोलीभाषेतील नाटकांची स्पर्धा भरवावी असे वाटते. आपल्याकडे वऱ्हाडी, अहिराणी, मालवणी, कोल्हापुरी अशा अनेक बोलीभाषा आहेत. त्यातून होणारी साहित्यनिर्मितीही अमाप आहे. त्या नाटकांना व्यासपीठ मिळावे असे वाटते. त्यादृष्टीने मी या वर्षभरात प्रयत्न करेन,' अशी भूमिका ज्येष्ठ नाटककार गंगाराम गवाणकर यांनी ९६व्या नाट्यसंमेलनाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर व्यक्त केली.

गवाणकर म्हणाले की, बोलीभाषांना व्यासपीठ मिळाले, तर राज्यातील ग्रामीण भागासह आदिवासी भागांतही होणाऱ्या साहित्य निर्मितीला नवे दालन खुले होईल. नाट्यसंमेलनाध्यक्षपदाची जबाबदारी लक्षात घेता राज्यभरातील परिषदेच्या शाखांना भेटी देऊन बालरंगभूमीसाठी थिएटर उभे करायला आवडेल, असेही गवाणकर यांनी 'मटा'शी बोलताना सांगितले.

**नाटककार गंगाराम गवाणकर यांची भावना**



### गवाणकर की गज्वी?

रविवारी झालेल्या कार्यकारिणीमध्ये चार उमेदवारांपैकी प्रेमानंद गज्वी आणि गवाणकर या दोन नावांवर बराच खल झाला. दोघांच्या योगदानाबद्दल कुणाच्याच मनात शंका नव्हती. परंतु, कार्यकारिणीत असे दोन गट पडल्याचे समजते. अखेर, बराच खल झाल्यानंतर गवाणकर यांच्याबाजूने एकमताने निर्णय घेण्यात आला.

### गावणकर यांच्याबद्दल...

**नाटके :** वेडी माणसे, वस्त्रहरण, वात्रट मेले, वर भेटू नका, दोघी, वन रूम किचन, वरपरीक्षा.

**पुस्तके :** व्हाया वस्त्रहरण, ऐसपैस

**पुरस्कार :** नाट्यपरिषदेचे गो. ब. देवल व आचार्य अत्रे पुरस्कार. बोरीवली नाट्यपरिषदेचा जीवनगौरव.

### पालिका लक्ष देईल काय?



मुंबई उपनगरामधील कांदिवली पूर्व येथे ठाकूर कॉम्प्लेक्समधील वसाहतीमध्ये पाण्याची वेळ सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत असते. परंतु महानगरपालिकेने २० टक्के पाणी कमी केले असता पाण्याची वेळ सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत केली आहे म्हणजेच दोन तासाऐवजी एक तास केल्यानंतर ५० टक्के पाणी कमी झाले आहे. आपल्या खात्याकडून २० टक्के पाणी कमी करण्यात आले असताना ही जादा कपात का?

- **सदानंद महाडिक,** कांदिवली





### प्रवाशांवर कारवाई करणार का?

दादर-सावंतवाडी राज्यराणीमध्ये बोगीत प्रवासी दारू आणि धुम्रपान करीत होते. पण त्या लोकांना कोणाची पर्वा नव्हती. टीसी वा अन्य यंत्रणेकडूनही त्यांच्यावर कारवाई झाली नाही. गाडीमध्ये अशा वर्तणुकीवर निर्बंध आहेत. तेव्हा मध्य रेल्वे अशा प्रवाशांवर कारवाई करणार का?

- **एक ज्येष्ठ नागरिक**

### 'वाहतुकीला अडथळा नको'



मालाड मालवणी विभागातील ब्लॉक नं. ५ स्थानकापासून साई श्रद्धा शॉपिंग सेंटर स्थानकापर्यंतच्या संपूर्ण रस्त्यावर नेहमीच वाहतूककोंडी होते. संपूर्ण रस्त्याच्या दोन्ही कडेला अनधिकृत पार्किंग असते. दोन चाकी वाहने तसेच रिक्षा, टॅक्सी बेशिस्तपणे उभ्या असतात. येथील रस्तेही खड्डेमय झालेले आहेत. टोईंग व्हॅनचा अभाव आहे. इतक्या मोठ्या विभागात एकही वाहतूक पोलिस नाही. बऱ्याच वेळा तर फूटपाथवरही पार्किंग असते. येथील म्हाडाच्या स्थानिक परिसरातही रस्त्यावर अनधिकृत पार्किंग असते. इतक्या सर्व अडचणींतून बसला खूपच अडथळा निर्माण होतो. नेहमीच छोटे-मोठे अपघात होत असतात. प्रशासनाने वेळीच लक्ष देऊन सरकारी वाहतुकीला होणारा हा अडथळा दूर करावा.

- **हर्षाली गुरव,** मालाड

### 'बस क्र. ४४२चा मार्ग विस्तारित करावा'

बस क्र. ४४२ ही सदभक्ती मंदिर जोगेश्वरी (पूर्व) ते म्हाडा कॉलनी (PMGP) अंधेरी पूर्व अशी धावत आहे. ही बस बांद्रेकरवाडी हायवे सिग्नलवरून पुढे जोगेश्वरी-विक्रोळी लिंकरोडमार्गे शेवटी म्हाडा कॉलनीपर्यंत जाते. ही बस जर बांद्रेकरवाडी सिग्नलवरून दोन स्टॉप पुढे विस्तारित करून जयकोच कंपनी येथील सिग्नलवरून पुढे जोगेश्वरी-विक्रोळी लिंक मार्गाने जर पुढे नेली तर याचा फायदा सीतानगर, लक्ष्मणनगर, रामनगर, हनुमाननगर, बिंबिसारनगर म्हाडा कॉलनी येथील प्रवाशांना होईलच, तसेच जयकोच या विभागात अनेक कारखाने व कॉर्पोरेट ऑफिसेस आहेत. येथील कामगार वर्गालाही याचा लाभ घेता येईल, तेव्हा बेस्ट व्यवस्थापनाने वरील सूचनेचा गांभीर्याने करावा.

- **गणेश हिरवे,** जोगेश्वरी (पूर्व)

### 'दाद-फिर्याद'साठी आवाहन

तुमच्या परिसरात, कार्यालयाच्या ठिकाणी, प्रवासादरम्यान अनेक गैरसोयी, नागरी समस्यांना तुम्ही सामोरे जात असता. या समस्या उजेडात आणण्यासाठी म.टा. ने 'दादफिर्याद' हे व्यासपीठ खुले केले आहे. या स्तंभाच्या माध्यमातून तुम्ही तुमच्या तक्रारी समाजासमोर मांडू शकता. त्यासाठी आमचा ई मेल ॲड्रेस आहे dadfiryad@gmail.com तुमचे गाऱ्हाणे म.टा. च्या कार्यालयात पत्राद्वारे, फॅक्सद्वारेही पाठवू शकता.

आमचा पत्ता : दाद-फिर्याद, महाराष्ट्र टाइम्स, दुसरा मजला, टाइम्स ऑफ इंडिया बिल्डिंग, डॉ. डी. एन. रोड, मुंबई - ४००००१. फॅक्स : २२७३११७५

**'मटा' ॲपवरील सर्वाधिक चर्चेतल्या बातम्या**

- 'वाचाळ' नेत्यांना भाजपाध्यक्षांनी दिली तंबी
- लोकलमध्ये रायफल खिडकीत, पोलीस दरवाजात!
- 'सनातनच्या हिटलिस्टवर CM फडणवीसही'
- चेन्नई, राजस्थान IPLमध्ये खेळत राहणार!

मटा ॲप डाउनलोड करा
app.mtmobile.in
मिस्ड् कॉल द्या
1800-103-8973

# शांताराम राऊत यांचे निधन



**म. टा. वृत्तसेवा,** ठाणे

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार आणि स्वस्तिकस्थ गणपतीचे रचनाकार शांताराम काशिनाथ राऊत यांचे गुरुवारी त्यांच्या ठाणे येथील निवासस्थानी निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने कलाक्षेत्रातील एक हुनहुन्नरी व्यक्तिमत्व हरपले.

वर्णद्वेषाविरुद्धच्या लढ्याविषयी त्यांनी चितारलेल्या पोस्टरला युनोचे प्रथम पारितोषिक मिळाले होते. स्वतिकस्थ गणपतीचे ते मूळ रचनाकार होत. बोधचिन्हकार अशी ओळख असलेल्या राऊत यांनी बोधचिन्हाचे महत्त्व कलाप्रेमींत रुजावे, म्हणून या विषयावर पुस्तकही प्रसिद्ध केले. छंद म्हणून विविध आकार, रुपाचे मुखवटेही साकारले. ठाण्यातील जुन्या नाटक मंडळी ग्रुपमध्ये ते कार्यरत असत. जिज्ञासा, आयपीएच तसेच अनेक सामाजिक संस्था, संघटनांशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता. जिज्ञासा ट्रस्टचे ते विश्वस्त होते.

राऊत यांनी जे. जे. कला महाविद्यालयातून उपयोजित कलेतील पदवी घेतली होती. स्वस्तिक स्वरूप गणेशाप्रमाणे त्यांनी इतरही देवतांच्या व मंगल प्रतीकांच्या कलाकृती तयार केल्या. संयुक्त राष्ट्रसंघाने (युनो) आयोजित केलेल्या चार स्पर्धांमध्ये राऊत यांना प्रथम पारितोषिक मिळाले होते. स्वस्तिकातील मंगलमूर्ती ही शांताराम राऊत यांची कलाकृती युनेस्कोने आशियाई सांस्कृतिक ठेवा म्हणून स्वीकारली आणि तेहरानमधील आशियाई ग्राफीक डिझाइन या प्रदर्शनात मांडली होती. बोधचिन्हांमध्ये रमलेले राऊत कालांतराने सरस्वती प्रतिमांमध्येही व्यग्र झाले. त्यामुळे त्यांना बोधचिन्हवाले आणि सरस्वतीवाले अशा दोन्ही नावांनी ओळखले जाते. बोधचिन्ह हे त्यांचे पुस्तक प्रसिद्ध आहे. राऊत यांच्या पश्चात रूपक आणि बहर ही दोन मुले आहेत.

Advertorial

**वजन कमी करायचे असते तेव्हा माझा विश्वास फक्त मेदोरावर**

**अनुशका, मुंबई.**

एक सामान्य गृहिणी आणि दोन मुलांची आई असल्याने माझ्या स्वतःच्या शरीराकडे लक्ष देणे फारच मुश्कील होते. माझ्या गरोदरपणानंतर माझे वजन खूपच वाढले. त्यामुळे मला हवं तसं जगण्याचा, इच्छेनुसार जीवनाचा आनंद लुटता येत नव्हता. त्यामुळे वजन कमी करण्यासाठी चांगले वैद्यकीय उपचार घ्यायचे होते. अखेर वजन कमी करण्यासाठी माझा परिचय मेदोरा या अगदी परिणामकारक आयुर्वेदिक उपचाराशी झाला. काही महिन्यानंतर माझे वजन १५ किलोनी कमी झाले. कोणत्याही साईड इफेक्टशिवाय या उपचाराने माझ्या शरीरात यशस्वी काम केले आणि माझे वजन सहजपणे कमी झाले. माझे मित्र आणि परिवार मेदोरावर विश्वास ठेवायला तयार नव्हते पण त्यांनी माझ्यात झालेला बदल पाहिला मग त्यांना विश्वास ठेवावा लागला.जर तुम्हाला कोणत्याही कठोर डाएट शिवाय खरचं वजन कमी करायचे असेल तर मेदोराचे सेवन करा. मेदोरा सर्व आउटलेटस् मध्ये उपलब्ध . अधिक माहितीसाठी संपर्क : 7666233233





**एम इ पी इन्फ्रास्ट्रक्चर डेवलपर्स लिमिटेड**
सीआयएन: L45200MH2002PLC136779
रजिस्टर्ड ऑफिस: ए-412, बूमरँग, चांदिवली फार्म रोड, चांदिवली स्टुडिओ जवळ, अंधेरी (पूर्व), मुंबई - 400072
ई-मेल: investorrelations@mepinfra.com वेबसाईट: www.mepinfra.com
टेलिफोन: 91 22 6120 4800 फॅक्स: 91 22 6120 4804

याद्वारे नोटीस दिली जाते की लिस्टिंग कराराच्या खंड ४१ द्वारे कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक शुक्रवार दिनांक ६ नोव्हेंबर २०१५ रोजी आयोजित करण्यात आली असून त्यात कंपनीच्या ३० सप्टेंबर २०१५ रोजी संपलेल्या तिमाही आणि अर्धवर्षाकरिता, एकल आणि एकत्रित अशा दोन्ही प्रकारच्या अलेखापरिक्षित वित्तीय अहवालांचा विचार करून, मान्यता देऊन नोंदवण्यात येणार आहे आणि आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी अंतरिम लाभांश असल्यास तो घोषित करण्याचा विचार केला जाईल.

याशिवाय सेबी (प्रोहिबिशन ऑफ इनसाइडर ट्रेडींग) रेग्युलेशन्स २०१५ आणि कंपनीच्या कोड ऑफ कंडक्ट फॉर प्रिव्हेन्शन ऑफ इनसाइडर ट्रेडींग नुसार कंपनीच्या सिक्युरिटीजमध्ये व्यापार करण्यासाठी ट्रेडींग विंडो, २८ ऑक्टोबर २०१५ ते ८ नोव्हेंबर २०१५ (दोन्ही दिवस समाविष्ट) पर्यंत बंद राहील.

संचालकमंडळ करिता
एम इ पी इन्फ्रास्ट्रक्चर डेवलपर्स लिमिटेड
स्वाक्षरी/-
श्रीधर फडके
कंपनी सेक्रेटरी

ठिकाण: मुंबई
दिनांक: १६ ऑक्टोबर २०१५

The Times Group

Readers are recommended to make appropriate enquiries and seek appropriate advice before sending money, incurring any expenses, acting on medical or other advice or entering into any commitment in relation to any advertisement published in The Times Group publications. The Times Group does not vouch for the claims made by the advertisers. The Printer, Publisher, Editor, Owner and Officers of The Times Group publications shall not be held liable for any consequences, in the event the claims made by the advertisers are exaggerated, incorrect, false, misleading or if the claims are not honoured by the advertisers. The Times Group has invested in several companies; the names of some of the investee companies can be viewed on www.brandcapital.co.in

**चलार्थ पत्र मुद्रणालय : नाशिक रोड**
(भारत प्रतिभूति मुद्रण तथा निर्माण निगम लिमिटेड की इकाई)
भारत सरकार के पूर्ण स्वामित्वाधीन
Miniratna Category-I CPSE & ISO 9001:2008 & ISO 14001:2004 CERTIFIED CIN: U22213DL2006GOI144763
Tel No. : 0253-2463731
E-mail: gmcnp@spmcil.com
Website: www.spmcil.com

**Advt. No.03/2015**
The General Manager, Currency Note Press, A unit of SPMCIL (wholly owned by Govt. of India), Nashik Road, invites applications for filing up the following post:

| Post | Level | Pay Scale | No of Posts |
|---|---|---|---|
| Welfare Officer | S-2 | Rs.14500-32600 (IDA Pattern) | 01 (UR) |

For further details regarding Age, Qualification, Experience required etc., please visit our Website **http://cnpnasik.spmcil.com.** Closing Date of Application 20.11.2015.

Sd/-
Dy Manager-HR
For General Manager

**हॉकिन्स कुकर्स लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय: मेकर टॉवर, एफ 101, कफ परेड, मुंबई 400 005.
कॉर्पोरेट आयडेन्टिटी नंबर L99999MH1959PLC011304
ईमेल: ho@hawkinscookers.com
फोन: 022 2218 6607 - फॅक्स: 022 2218 1190
वेबसाईट: www.hawkinscookers.com

**सूचना**
30 सप्टेंबर 2015 रोजी संपलेल्या तिमाही आणि सहामाहीसाठी कंपनीचे अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष नोंदवून घेण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक शुक्रवार दिनांक 06 नोव्हेंबर 2015 रोजी आयोजित करण्यात आली आहे.

हॉकिन्स कुकर्स लिमिटेड साठी
सौ. हुतॉक्सी भेसानिया
कंपनी सेक्रेटरी
मुंबई
16 ऑक्टोबर 2015





MICRO, SMALL & MEDIUM ENTERPRISES
सूक्ष्म, लघु एवं मध्यम उद्यम
सत्यमेव जयते
PPDC
**MSME TECHNOLOGY DEVELOPMENT CENTRE**
MINISTRY OF MICRO, SMALL & MEDIUM ENTERPRISES
Government of India Organization
Foundry Nagar, Agra - 282006
Organises
4 DAYS CERTIFICATE COURSE ON
**SIX SIGMA**
MUMBAI GREEN BELT
Process Improvement Methodology
Concept of Zero defect Statistical Data Analysis
Problem Solving Technique
Dates 29, 30, 31 October & 01 November 2015
Time 09:30 AM - 05:30 PM
Fees Rs. 15,000/-(for General & OBC)
Rs. 7,500/- (for PH/Ex-Serviceman) Rs. 3,000/-(for SC/ST)
(Fee includes Course Kit, Lunch, Tea/Coffee)
Venue HOTEL ROYAL PARK, Patel Complex, Near Safed Pool Bus Stop Andheri-Kurla Road Off-Sakinaka, Andheri (E), MUMBAI- 400072
For details & online registration visit: www.ppdcagra.in
Contact : 09897998315, 09760030043, 09760547805
0562-6451234, 2344381 E-mail: info@ppdcagra.in
Please bring Photo & Copy of Qualification Certificates
Certificate will be awarded





Shop online at: www.Jewelsouk.com | www.gitanjaligifts.com

Maya Jewels : Andheri: Ground Floor, Infiniti Mall, New Link Road. Tel: 022 6710 5505. Giantti Luxury Ensemble : Hotel Grand Hyatt, 33, 1st Floor, Santacruz East, Mumbai- 400055. Ph 022 66761234 / 33787722 NIRVANA RETAIL OUTLET : MUMBAI: AMBERNATH: Goodwin Jewellers (0251-6551234) DOMBIVALI : Goodwin Jewellers (0251-2439608/2442167) Kandivali (W): Pritam Jewellers (022-28016647/28619975) MIRA ROAD: Goodwin Jewellers (022-28554220/50/60) VIRAR (W): Vipul Jewellers (95250-3058282, 9320333324/9324347609) Modern Trade : Shoppers Stop : Malad, Vashi, Andheri , Thane- Vivana Mall , Ghatkopar-Rcity Mall; Ghatkopar; Bandra; Mulund , Kalyan I Globus: Growel's 101 Mall, Kandivali , Thane

Franchise Enquiries: 9702166411/7028602002/9871116777/9967376464/022-42458834. Timings : 8.00 am to 8.00 pm. E-Mail: franchiseenquiry@gitanjaligroup.com For Distributor & Retailer enquiries: 7208007959, E-Mail: info.drw@gitanjaligroup.com Corporate Enquiries: 9920997549, 9702056111, 9820722036 E-Mail: corporatesales@gitanjaligroup.com General Enquires: Email Us At gv@gitanjaligroup.com Toll Free No.:1800 102 4480/82.

Certified by INDEPENDENT GEMOLOGICAL LABORATORIES